दैनिक साहसिक
संमिश्र

पान १ वरुन...

५०० कोटीची जागा बळकाविण्यासाठी न्यायालयात खोटी कागदपत्रे दाखल...

नी जिल्हा भूमी अभिलेख निरीक्षक (District Inspector of Land Records: DILR) यांच्याकडून अहवाल बोलाविला नंतर जागेचा पंचनामा व तलाठी मार्फत सर्व चौकशी करून त्या जागेवर नोटीस प्रकाशीत केली. तसेच मुळ मालक श्री. अच्युत ईनामदार यांची साक्ष नोंदविली. या सर्व चौकशीनंतर तहसिलदार यांनी विठ्ठल कोळी यांना ३२-M नुसार जागेचा मालक घोषीत केले. परंतू जागेच्या किंमती वाढल्यामुळे व ती जागा ५०० कोटीपेक्षा जास्त किंमतीची असल्यामुळे खंडेलवाल कंपनीचे संचालक संजय पटेल यांनी ती जागा बळकाविण्याच्या दृष्ट हेतूने विविध न्यायालयात अर्ज दाखल केले.

खंडेलवाल कंपनीने अशी खोटी कहाणी तयार केली की त्यांनी ती जागा मुळ मालक श्री. अच्युत ईनामदार यांच्याकडून सन १९७० मध्येच विकत घेतली असून त्यांनी जागा अकृषक परवानगी (N.A.) असल्याबाबत जिल्हाधिकारी मुंबई, उपनगरे जिल्हा यांच्याकडून परवानगी घेतली आहे. परंतू खंडेलवाल कंपनीचा खोटेपणा महाराष्ट्र महसूल प्राधिकरण (Maharashtra Revenue Tribunal: MRT) पुढे चालल-ेल्या चौकशीत उघड झाला. प्राधिकरणाने आदेशात स्पष्ट केले की खंडेलवाल कंपनीची अकृषक परवानगी ही बोगस असून त्या जागेचे मालक विठ्ठल सोवार कोळी हेच आहेत व ते त्या जागेवर सन १९५७ पासून शेती करीत आहेत व आजही ती जागा शेतीचीच आहे.

त्या आदेशाविरूद्ध खंडेलवाल कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका सन २००१ मध्ये दाखल केली.

ती याचिका प्रलंबित असतांनाच विठ्ठल कोळी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे सहा वारस होते. त्यामध्ये १. बेबीताई कोळी (पत्नी), २. आनंदी कोळी (विवाहीत मुलगी), ३. महादेव कोळी (मुलगा), ४. काशीबाई कोळी (विवाहीत मुलगी), ५. कृष्णा कोळी (मुलगा), ६. लता भंडारी (विवाहीत मुलगी) इत्यादी वारस होते.

परंतू खंडेलवाल कंपनीचे संचालक व गुन्ह्याचे मुख्य सुत्रधार संजय पटेल यांनी न्यायालयात फक्त ३ वारस उभे करून त्या वारसांना काह-ीही न सांगता त्यांना धमकावून व त्यांच्यावर दबाव आणून इंग्रजीमध्ये बनविलेल्या कागदपत्रांवर अशिक्षीत असलेल्या तीन वारसाचे अंगठे घेऊन न्यायालयात तडजोड करारनामा (Consent Term) दाखल केला व न्यायालयाला असे भासविले की विठ्ठल कोळी यांना फक्त तीनच वारसदार आहेत आणी त्यांना जागेवर कोणताही हक्क सांगायचा नाह-ी तसेच खंडेलवाल यांना त्या जागेचा मालक घोषीत करावे. त्यानंतर न्यायालयाकडून त्या बोगस तडजोड करारनामाच्या आधारावर आदेश मिळवून खंडेलवाल कंपनीने त्या जागेवर मालकी हक्क सांगणे सुरू केले. जेव्हा ही बाब विठ्ठल कोळी यांच्या वारसांना कळली तेव्हा त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दीवाणी दावा क्रं. १४१८/२००७ हा दाखल केला. उच्च न्यायालयाने तो दावा नगर दीवाणी व सत्र न्यायालय मुंबई यांच्याकडे दावा क्रं. ५०२६/२००७ म्हणून वर्ग केला. त्या दाव्यामध्ये उत्तरवादी असलेले खंडेलवाल कंपनीने खोटे शपथपत्र दाखल करून तब्बल ११ वर्षे त्या दाव्याला विरोध केला. खुप वर्षे काहीही हाती लागत नसल्याने निराश झालेल्या विठ्ठल कोळीच्या वारसांना शेवटी साम्राज्य बिल्डर्सचे सुरेन्द्र मिश्रा व वासुदेव पाटील या भागीदारांनी मदत केली. त्यांनी ७/१२ वर वारसांचे नाव लावून नंतर तहसिलदार यांची परवानगी घेवून ती जागा रीतसर खरेदी केली. वारसाना त्यांचा हक्क देण्यासाठी संपूर्ण खर्चाची जबाबदारी घेतली. सुरेन्द्र मिश्रा यांनी ॲड. निलेश ओझा यांना या प्रकरणात वकील नेमले. ॲड. निलेश ओझा यांनी आरोपी खंडेलवाल कंपनीचा खोटेपणा उघडकीस आणून त्यांच्यावर फौजदारी कारवाईसाठी अर्ज नोटीस ऑफ मोशन क्रं. ३४७६/२०१७ हा दाखल करून फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम ३४० नुसार कारवाईची विनंती न्यायालयास केली.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून सत्र न्यायाधीश श्री. के. आर. जोगळेकर यांनी चौकशी केली. न्यायालयाने बोरीवलीचे तहसिलदार व बांगूरनगर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरिक्षक यांना सर्व कागदपत्रांसह न्यायालयात हजर राहण्यास सांगीतले.

तहसिलदार बोरिवली यांच्यावतीने तलाठी मनीषा नागले हजर झाल्या. त्यांनी त्यांचा चौकशी अहवाल सादर करून विठ्ठल सोवार कोळी यांना सहा वारस असल्याची साक्ष दिली. तसेच त्या अहवालाच्या आधारावर उप-विभागीय अधिकारी (S.D.O.) यांनी पारीत केलेले आदेशही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

या पुराव्यावरून खंडेलवाल कंपनीने न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्राचा खोटेपणा उघडकीस आला कारण खंडेलवाल कंपनीचे असे म्हणने होते की विठ्ठल कोळी यांना फक्त तीनच वारस होते. या चौकशीमुळे खंडेलवाल कंपनीचा २५.०६.२००२ चा तडजोड करारनामा (Consent Terms) हे बोगस असल्याचे सिद्ध झाले.

तसेच बांगुरनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पाटील यांनी न्यायालयात साक्ष दिली की सदर जागेवर सन २०१० मध्ये, खंडेलवाल कंपनीचे संजय पटेल व किरीट ठक्कर यांनी जबरदस्तीने घुसून ताबा घेण्याचा प्रयत्न करून विठ्ठल कोळी यांच्या वारसांच्या कायदेशीर ताब्यास अडथळा आणल्यामुळे संजय पटेल व किरीट ठक्कर यांच्याविरूद्ध एन. सी. गुन्हा क्र. १८६९/२०१० हा १८ डिसेंबर २०१० रोजी नोंद करण्यात आला होता. हे पुरावे आणि तहसिलदार या-ंच्या चौकशी अहवालावरून हे सिद्ध झाले की त्या जागेवर खंडेलवाल कंपनीचा कधीच ताबा नव्हता. उलट खंडेलवाल कंपनीचे गुन्हेगार संचालक विठ्ठल कोळी यांच्या वारसांचा ताबा हिसकावून जागा बळकाविण्याचा प्रयत्न करत होते.

अशाप्रकारे खंडेलवाल कंपनीचा खोटेपणा उघडकीस आल्यानंतर नगर दीवाणी व सत्र न्यायाधीश श्री. के. आर. जोगळेकर यांनी सत्र न्यायालयाचे अधीक्षक यांना असे आदेश दिले की, खंडेलवाल कंपनीच्या सर्व संचालकांविरूद्ध भां.द.वि. १९१, १९२, १९३, १९६, १९९, २००, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४ आदी कलमाअंतर्गत महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयात केस दाखल करावी. सदर मालमत्ता ही ५०० कोटी रूपये किमतीची असून आरोपींनी तब्बल ११ वर्षे हे प्रकरण लांबविले असल्यामुळे अर्जदाराचे १०० कोटी रूपये नुकसान भरपाईची मागणी केली होती. त्यावर सत्र न्यायालयाने ती मागणी महानगर दंडाधिकारी मुंबई यांनी विचारात घ्यावी असे आदेश पारित केले.

तसेच केसचा संपुर्ण खर्च हा आरोपींनी द्यावा असे आदेश न्यायालयाने दिले असून केस लढणारे वकिल ॲड. निलेश ओझा या-ंची फी एकुण २५ कोटी रूपये व इतर खर्च ७० लाख रूपये असल्याचे बिलासहीत अर्जदाराने आरोपींना नोटीस देवून २५ कोटी ७० लाख रूपये ३ दिवसात डी. डी. द्वारे आणून
द्यावेत अशी मागणी केली आहे.

सत्र न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट नमूद केले आहे की जेव्हा खंडेलवाल कंपनीच्या संचालकांनी दिलेले शपथपत्र हे खोटे असल्याचे शासनाच्या रेकॉर्डवरून व उपलब्ध पुराव्यावरून सिद्ध झाले होते व त्याब-ाबत आरोपींना माहिती देण्यात आल्यानंतरसुद्धा आरोपींनी त्यांचे खोटे शपथपत्र न्यायालयातून परत घेतले नाही. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध फौजदारी कारवाई केल्याशिवाय न्यायालयापुढे कोणताही पर्याय नाही. असा स्पष्ट कायदा मुंबई उच्च न्यायालयाने ठरवून दिला आहे व त्या कायद्यानुसार न्यायालय आदेश पारीत करीत आहे.

या प्रकरणात अर्जदाराच्या वतीने ॲड. निलेश ओझा यांच्यासह ॲड. विजय कुर्ले, ॲड. ईश्वरलाल अग्रवाल, ॲड. पार्थो सरकार, ॲड. तनवीर निजाम, ॲड. कर्तव्य परमार, ॲड. अभिषेक मिश्रा, ॲड. मानसी जैन, ॲड. शिवम मेहरा, ॲड. अभय सिंग, ॲड. तन्वी कांबळी, ॲड. शशीकला चव्हाण, ॲड. विवेक रामटेके, ॲड. गोपाल कऱ्हाळे, ॲड. जयराम यादव, ॲड. प्रवीण चवरे, ॲड. एल्लमाल थंडापाणी यांनी बाजू मांडली.

कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल २०० रुपयांचे

विशेष प्रतिनिधी/ २० डिसेंबर

मुंबई : राज्यातील कांदा उत्पादकांना दिलासा देणारा अतिशय महत्त्वाचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. कोसळलेल्या भावामुळे अडचणीत आलेल्या कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल २०० रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून आजवर कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल देण्यात येणारी ही सर्वाधिक मदत आहे. १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्री केलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

राज्यातील कांदा हे महत्त्वाचे नगदी पीक असून ते खरीप, उशिराचा खरीप आणि रब्बी अशा हंगामात घेतले जाते. खरीप आणि उशिराचा खरीप हंगामात उत्पादित होणारा कांदा रब्बीच्या तुलनेत जास्त दिवस टिकवून ठेवता येत नाही. सध्या खरीप व रब्बी हंगामातील कांद्याची राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. नोव्हेंबर महि-न्यात झालेली कांद्याची एकूण आवक ४१.२३ लाख क्विंटल आहे.

कांद्याचे भाव समाधानकारक नसल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार उत्पादकांना प्रतिक्विंटल २०० रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे.

एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त २०० क्विंटल कांद्यासाठी ही मदत देण्यात येणार असून १ नोव्हेंबर २०१८ ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये ज्या शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आपल्या कांद्याची विक्री केली आहे, त्यांनाच या निर्णयाचा लाभ मिळू शकेल.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती वगळता राज्यातील सर्व बाजार समित्यांसाठी हा निर्णय लागू असेल. हे अनुदान थेट बँक हस्तांतरणाद्धारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे. या योजनेसाठी एकूण १५० कोटींचा निधी मंजूर करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

कांद्याला जाहीर केलेलं अनुदान ही तर फसवणूक

महाराष्ट्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २०० रूपये, म्हणजेच प्रति टन २००० रूपये अनुदान देण्याचा निर्णय गुरूवारी घेतला. या अनुदानाचा फायदा राज्यातील ७५ लाख टन कांद्यास मिळणार असल्याचे मुख्यमंत्री सांगतात. यासाठी १५० कोटी रूपये खर्च येणार असून ही आतापर्यंतची सर्वाधिक मोठी मदत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. मात्र ही फसवणूक असल्याचं सकृतदर्शनी दिसत आहे.

जर ७५ लाख टन कांद्यास प्रति टन २००० रूपये अनुदान द्यायचे झाले तर त्यासाठी १५०० कोटी रूपये लागतील, १५० कोटी नव्हे. परंतु सरकारनं १५० कोटी रुपयांची तरतूद केल्याचं जाहीर केलं आहे. त्यातही विशेष म्हणजे ही मदत केवळ १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीत ज्यांनी कांद्याची विक्री केली त्यांना मिळणार आहे. ज्यांनी दर कमी आहे, वाहतुकीचा खर्च निघत नाही म्हणून उन्हाळ कांदा कुजवला त्यांना ही मदत मिळणार नाही हे उघड आहे. अजूनही उन्हाळ कांद्याची १ ते ३ रूपये किलोने विक्री सुरू आहे. ज्यांनी १५ डिसेंबर नंतर कांदा विकला आहे त्यांना अनुदान मिळणार नाही.

यातही लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, या क्षेत्रातल्या तज्ज्ञांनी बोलताना सांगितलं की महाराष्ट्राचं कांद्याचं वार्षिक उत्पादन हे ७५ लाख टन आहे. कांदा हे फक्त महिना-दोन महिने घेतलं जाणारं पिक नाही. शेतकरी कांदा वर्षभर विकत असतात. असं असताना या दीड महिन्याच्या काळातच महाराष्ट्रातल्या शेतक-यांनी ७५ लाख टन कांदा विकला हे सरकारनं कुठून शोधून काढलं हे कळायला मार्ग नाही. त्यामुळे उत्पादन झाल्यानंतर वर्षभर विकल्या जार्णाया ७५ लाख टन कांद्यास कशी मदत मिळणार? हा मुख्य प्रश्न असून ही फसवणूक असल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

२०१६ मध्ये कांद्याचे दर पडल्यानंतर राज्य सरकारने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १०० रूपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. आज दोन वर्षे उलटूनही अनुदान मिळालं नसल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. त्यामुळे आज जाहीर झालेल्या अनुदानाचा त्यांना लाभ होईल हे खरं का मानावं? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

ओबीसी आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात

विशेष प्रतिनिधी/ २० डिसेंबर

मुंबई : फडणवीस सरकारने मराठा समाजाला दिलेल्या १६ टक्के आरक्षणाचा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयात असताना, आता ओबीसी समाजाला दिलेल्या ३२ टक्के आरक्षणाला हायकोर्टात आव्हान देण्यात आलं आहे. महाराष्ट्रात ओबीसींना देण्यात आलेलं आरक्षण हे कोणत्याही सर्वेक्षण अथवा अभ्यासाच्या आधारे देण्यात आलेलं नाही. मग ते योग्य कसं? असा सवाल करत बाळासाहेब सराटे यांच्यावतीने हायकोर्टात नवी जनहित याचिका सादर करण्यात आली. मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी ही याचिका सादर झाली. या याचिकेवर ९ जानेवारी रोजी सुनावणी घेण्याचं हायकोर्टाने ठरवलं आहे.

ओबीसींना दिलेल्या आरक्षणाचा सर्वेक्षणामार्फत अभ्यास करुन या समाजाचा आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणा तपासण्याचे निर्देश राज्य मागास प्रवर्ग आयोगाला देण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. तसेच ३२ ते ३४ टक्के असलेल्या या समाजाला दिलेलं ३२ टक्के आरक्षण हे जास्त असल्याचा दावाही याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे कोर्टात आता मराठा विरूद्ध ओबीसी संघर्ष पेटण्याची चिन्ह आहेत.

साल १९६७ साली ओबीसीत भटक्या विमुक्त अशा १८० जातींचा समावेश करण्यात आला. त्यानंतर २३ मार्च १९९४ मध्ये १४ टक्के आरक्षणावरुन हे आरक्षण थेट ३० टक्यांवर नेण्यात आले. राज्य सरकारचा हा निर्णय चुकीचा असून त्यालाही यात आव्हान देण्यात आलं आहे. ३१ मार्च २०१५ च्या आकडेवारीवरुन सध्या सरकारी आणि निमसरकारी नोकऱ्यामध्ये ओबीसींचं प्रमाण ४१ टक्के आहे, जे दिलेल्या आरक्षणापेक्षाही जास्त आहे.

मराठा समाजचा ओबीसींमध्ये समावेश करण्यास जोरदार विरोध झाल्यानंतर मराठा समाज हा आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास असल्याचा निर्वाळा देत स्वतंत्र गट तयार करुन मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात आलं आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशांनुसार ५० टक्के आरक्षणाची मर्यादा असतानाही राज्यातील आरक्षण ६८ टक्क्यांवर गेल्याने मराठा समाजाच्या आरक्षणाला हायकोर्टात आव्हान देण्यात आले.

विदर्भ संगीतमय कलावंताचा मेळावा, सत्कार व गी-

प्रतिनिधी / २० डिसेंबर

वर्धा : भद्रावती येथील सुमठाणा आनंद नगर येथे दरवर्षी भारतीय संविधान दिन व डॉ.बाब-ासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त नुकताच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून साहेब घोरुडे (पाटील) भद्रावती कार्यक्रमाचे अध्यक्ष, ॲड.सुर्यभानजी पाटील व कार्यक्रमाचे मार्गदर्शक मधुकर बावलकर जेष्ठ साहित्यीक कवी व सामाजिक कथाकर्ते आदिलाबाद (तेलंगणा), प्रा.डॉ.अजय दहेगावकर, ॲड.मिलींद रायपुरे सदर कार्यक्रमाचे उद्घाटक व अध्यक्ष प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस दिप प्रज्वलीत करुन हारअर्पण करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी बी.डी.मडावी (पोलिस निरीक्षक भद्रावती), कुशल मेश्राम (महाराष्ट्र प्रदेश सचिव भारीप बहुजन महासंघ), सुशिल देवगडे (नगरसेवक), सदानंद वाघ (सामाजिक कार्यकर्ते) चंद्रपूर हे प्रामुख्याने उपस्थित होते.

त्यानंतर विदर्भातून आलेल्या संपूर्ण कवी, गायक, गायीका तसेच सामाजिक कार्यकर्ते यांना शाल देवून सत्कार करण्यात आला. त्यानंतर संगीतमय कलावंताचे गित गायनाचा कार्यक्रम सुरु करण्यात आला. यावेळी वर्धा जिल्हाधिकारी तहसिल हिंगणघाट येथील महान-ंदा भारती (भगत) कलावंत यांनी सर्वप्रथम उत्कृष्ट गितगायन करुन कलाकाराचे आवाज बुंलद केला. यावेळी पदमाकर भगत वर्धा गायक यांनी गीत सादर केले व विदर्भातून आलेल्या कलाकारांनी आपले एक-एक गिते सादर केली. महाराष्ट्राच्या सुप्रसिद्धी गायीका, वैशाली वाघमारे यवतमाळ, सारीका वेल्हे बल्लारपूर, वृंदा भारती भद्रावती, आशा मेश्राम अमरावती, पंचफुला हरणे अमरावती, वसंताबाबू आडे आदिलाबाद तेलंगणा, प्रविण राजहंस यवतमाळ, किशोर दारव्हेकर भद्रावती, सदानंद टिपले गडचांदूर, पवन गौरकार, पदमाकर कांबळे वर्धा, आनंद भगत भद्रावती, शंकर वनकर बल्लारपूर इत्यादीने विदर्भातील कलावंतानी गिते सादर केले. त्या-ंना संगीताची साथ संगत, अस्मित डोफेकर (तबला वादक), देविदास कातकर (तबला वादक), बवसरिया (ढोलवादक), सोनू उज्जवाल (ढोलवादक), भुषण कातकर (हार्मोनियम वादक), राहुल काळे (बन्जोवादक), बॅन्जो वादक लाडे यांनी साथ संगत केली. यावेळी चंद्रपूर, भद्रावती, यवतमाळ इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते व गायक मुकुंदा कळसकर याने गिते सादर केली.

मोदीच देशाला वाचवू शकतात, चिठ्ठी लिहून तरुणाची..

घटनेचा तपास करणारे पोलीस निरीक्षक एन. मोहन राव यांनी दिली आहे. त्याला राजकारणाबद्दल आवड होती आणि राजकारणाबद्दल स्वत:चे मत तो नेहमी मांडायचा असंही राव यांनी सांगितलं.
याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

भाजपाला दिलासा, रथयात्रेला कोलकाता हायकोर्टाची परवानगी

यापूर्वी शनिवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपाच्या रथयात्रेला परवानगी दिली तर जातीय तेढ निर्माण होऊ शकतो असं म्हणत परवानगी नाकारली होती. २२ डिसेंबरला कूचबिहार येथून ही यात्रा सुरू होत असून २४ डिसेंबर रोजी दक्षिण परगना जिल्ह्यातील काकद्वीप येथून २६ डिसेंबर रोजी बीरभूम जिल्ह्यातील तारपीठ मार्गे असणार आहे.

पान ८ वरुन...

भारतमाला परीयोजनेतून देशभरातील ५५० जिल्हे जोडण्याचा केन्द्र सरकारचा निर्णय-खासदार रामदास तडस

केन्द्रीय मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी यांचे अथक परीश्रम व दुरदृष्ठी कारणीभूत असून त्यांच्या संकल्पनेतून २०२१-२२ पंर्यत भारतातील ५५० जिल्हे महामार्गांनी जोडले जातील अशी प्रतिक्रीया खासदार रामदास तडस यांनी यावेळी दिली.

हिंगणघाट येथे होणाऱ्या विविध जनावरांच्या भव्य पशुप्रदर्शनीचा पशुपालकांनी लाभ घ्यावा - मुकेश भिसे

न.प.हिंगणघाट, श्रीमती सुवर्णा भोयर उपसभापती पं.स.हिंगणघाट, चंदू घुसे, उपाध्यक्ष न.प.हिंगणघाट सन्मा.जि.प.सदस्य, धनराज तेलंग, श्रीमती जोत्सना सरोदे, शरद शहारे, मिलींद कोपुलवार, माधव चंदनखेडे उपस्थित राहणार आहेत. तसेच पं.स.हिंगणघाटचे सन्मा.सदस्य श्रीमती वंदना मडावी, अमोल गायकवाड, प्रशांत चंदनखेडे, श्रीमती मंगला बागेश्वर, श्रीमती कविता वानखेडे, विजय पर्वत, श्रीमती छाया बोरकर, संभाजी देवढे, श्रीमती मंजुष ठक, श्रीमती वैशाली पुरके, श्रीमती कुमुदीनी बोबडे, आशिष पोटरकर आणि नगर परिषद, हिंगणघाटचे मुख्याधिकारी मिनीनाथ दंडवते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अशोक खाडे गटविकास अधिकारी पं.स.हिंगणघाट, राजेराव पाटील सहायक गट विकास अधिकारी हिंगणघाट प्रदर्शनीचे आयोजक डॉ.शशीकांत मांडेकर, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), हिंगणघाट आणि डॉ.पी.आर.वानखेडे, डॉ.बी.व्ही.वंजारी, पशुधन विकास अधिकारी जि.प.वर्धा तसेच पशुसंवर्धन विभागातील समस्त अधिकारी व कर्मचारी वर्ग प्रयत्नशील असून या विविध जनावरांच्या प्रदर्शनीमध्ये पशुपालकांनी जातीवंत जनावरे आणून लाभ घ्यावा असे आवाहन मुकेश भिसे सभापती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती जिल्हा परिषद वर्धा, डॉ.राजीव भोजने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, डॉ.प्रज्ञा डायगव्हाणे, गुल्हाणे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी आणि डॉ.शशीकांत मांडेकर, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), हिंगणघाट यांनी केलेले आहे.

पवनार येथे भागवत सप्ताहात शेतकरी संमेलन थाटात संपन्न

आहे. या धोरणाच्या विरोधात लढा उभारण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. या मेळाव्यात बाजीरावजी हिवरे, दिलीप वैद्य, नितीन कवाडे, प्रविण तडस, सुरज वैद्य, नितीन भोयर, प्रशांत सावरकर, रघुनाथ सोनटक्के, वैभव साखरकर, रंजित भांडवलकर, राम मगर या-ंची उपस्थिती होती.

आतातरी शासन आणि देवस्थान समिती धर्मशास्त्रानुसार कृती करतील का ?

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने श्री महालक्ष्मी देवीच्या नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून धर्मशास्त्र आणि भाविकांच्या श्रद्धा यांचा मान राखा !

विशेष प्रतिनिधी/ २० डिसेंबर

नवी दिल्ली : दोन वर्षापूर्वी कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मी मंदिरातील महालक्ष्मी देवीच्या मूर्तीवर वज्रलेप करण्यात आला, त्याला हिंदु जनजागृती समितीने सर्वप्रथम विरोध केला आणि धर्मशास्त्रसंमत पर्याय म्हणून नवीन मूर्ती आणून तिची प्राणप्रतिष्ठापना करण्याचा आग्रह धरला होता. मात्र त्या वेळी तत्कालीन जिल्हाधिकारी, देवस्थान समिती आदींनी याला विरोध करत धर्मशास्त्रविरोधी असा वज्रलेप करण्याचा निर्णय घेतला आणि तो प्रत्यक्षातही आणला. या वज्रलेपनातील त्रुटी किंवा अन्य गोष्टी यांमुळे देवीच्या मूळ रुपातच पालट झाला.

या प्रकरणी भाविकांनी तीव्र विरोध करूनही मूर्तीवरील वज्रलेपनाचे समर्थनच करण्यात आले. आता मात्र भाविकांकडून पुन्हा भग्न झालेली देवीची मूर्ती विसर्जित करून नव्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याचा आग्रह मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच देवस्थान समितीही आता याबाबत विचार करत असल्याची वृत्ते येत आहेत. उशीरा का होईना; पण हा विषय धर्मशास्त्रदृष्ट्या पूर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

यातून हिंदु जनजागृती समितीने दोन वर्षांपूर्वी घेतलेली धर्मसंमत भूमिका आज योग्य ठरत असल्याचे सिद्ध होत आहे.

आतातरी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने श्री महालक्ष्मी देवीच्या नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून धर्मशास्त्र आणि भाविकांच्या श्रद्धा यांचा मान राखावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे पश्चिम महाराष्ट्र संघटक श्री. मनोज खाडये या-ंनी केले आहे.

धर्मशास्त्राप्रमाणे मूर्तीची झीज झाली, तर तिच्यातून देवतेचे तत्त्व अल्प प्रमाणात मिळते. असे होऊ नये म्हणून धर्मात सांगितलेला तत्त्वोत्तारण विधी करून तिच्यातील देवतेचे तत्त्व काढून तिच्या जागी नवीन मूर्ती ठेवून तिची प्राणप्रतिष्टापना करणे योग्य आहे.

नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केल्यानंतर देवीतील चैतन्य पूर्वीप्रमाणे मोठ्या प्रमाणात प्रक्षेपित होऊन भाविकांना त्याचा आध्यात्मिक स्तरावर लाभ होईल.

सध्याच्या मूर्तीची इतकी झीज झाली आहे की, तिच्यावर अभिषेक करणेही बंद केले आहे. धार्मिक विधींतील अभिषेक हा महत्त्वपूर्ण विधीच बंद करून धार्मिक विधींवरही गंडांतर आणण्यात आले आहे. असे केल्याने आजवर भाविकांचे मोठ्या प्रमाणात आध्यात्मिक स्तरावर नुकसान झाले आहे, हे मात्र गंभीर आहे.

देवीची विधीवत पूजा करण्यामुळेच तिच्यातील देवत्त्व टिकून रहाते आणि तिच्यातील चैतन्य भाविकांना मिळते. देवीच्या नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्टापना केल्यास धार्मिक विधीही पूर्वीप्रमाणेच करणे सुकर होईल.

देवस्थान समिती आणि शासन यांना सुबुद्धी मिळो आणि ही सर्व प्रक्रिया लवकर पूर्ण होवो, अशी श्री महालक्ष्मी देवीच्या चरणी प्रार्थना !